महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कायालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दुरध्वनी क्र. ०७१२-२८७०१२०/२१ CIN - U85300PN2019NPL187405 ई-मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र/महाज्योती/स्पर्धा-परीक्षा/२१२६/२०२६-२७ दि:-२८/११/२०२६

परिपत्रक

विषय :- सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राबविण्यात येणाऱ्या कर्मचारी निवड आयोग, रेल्वे भरती, IBPS बँकिंग स्पर्धा परीक्षापूर्व प्रशिक्षणाकरिता विद्यार्थांची मेरीट यादी.

महाज्योती संस्थेमार्फत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राबविण्यात येणाऱ्या कर्मचारी निवड आयोग, रेल्वे भरती, IBPS बँकिंग स्पर्धा परीक्षापूर्व प्रशिक्षणाकरिता विद्यार्थांची निवड करण्यासाठी घेण्यात आलेल्या चाळणी परीक्षेची मेरीट यादी महाज्योती संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे, तसेच चाळणी परीक्षा दिलेल्या सर्व विद्यार्थांना प्रशिक्षण संस्था निवडीचा पर्याय दि.३०/११/२०२६ रोजी रात्री ११:५० वाजता पर्यंत उपलब्ध करून देण्यात येत आहे, सदर प्रशिक्षणाकरिता निवड व प्रशिक्षण संस्था निहाय यादी लवकरच महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, सर्व संबंधित विद्यार्थांनी याची नोंद घ्यावी.

नोट:-

१) **IBPS बँकिंग प्रशिक्षणाकरिता प्रशिक्षण संस्था निवडीचा पर्याय विद्यार्थांना लवकरच उपलब्ध करून देण्यात येईल.**

२) **निवड झालेल्या सर्व विद्यार्थांना मेरीटच्या आधारावर प्रशिक्षण संस्था समप्रमाणात उपलब्ध करून देण्यात येईल.**

३) **जे विद्यार्थी प्रशिक्षण संस्था निवडीचा अर्ज भरणार नाही, अशा सर्व विद्यार्थांना रिक्त असलेल्या प्रशिक्षण संस्था उपलब्ध करून देण्यात येईल.**

स्वा
(मिलिंद नारिंगे)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), नागपूर